# शिंगणापूर येथे कमिशन एजंटच्या हल्ल्यात पथकर कर्मचारी जखमी

**गणेशवाडी (वार्ताहर) –** नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूर येथील पथकर नाक्यावर कमिशन एजंटाने केलेल्या हल्ल्यात तेथे कार्यरत असणारा कर्मचारी जखमी झाल्याची घटना नुकतीच घडली आहे.

पोलीस सुत्रांकडून समजलेल्या माहितीनुसार २३ जुलै रोजी शिंगणापूर येथील पथकर नाक्यावर सोमनाथ अशोक बानकर, रा. शनिशिंगणापूर हे नेहमी प्रमाणे आपली ड्युटी बजावत असताना त्या ठिकाणी अविनाश दादाहरी सावंत, सागर भिमराव शिंदे दोघे रा. मुळा कारखाना हे पथकर नाक्यावर आले. फिर्यादी व ग्रामपंचायतच्या नावाने शिवीगाळ करू लागले. सागर शिंदे याच्या हातात धारदार कत्ती होती. तेव्हा फिर्यादी घाबरून त्या ठिकाणी देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या गाडीत जाऊन बसले असता सागर शिंदे याने त्या गाडीवर हल्ला करत गाडीचे नुकसान केले. तेव्हा फिर्यादी बसलेल्या गाडीच्या दुसऱ्या दरवाजातून पळून गेला. त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या इतरही कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत जिवे ठार मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीमध्ये म्हटले आहे.

दाखल फिर्यादीवरून अविनाश दादाहरी सावंत व सागर भिमराव शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा र नं. १७९/२०२४ बिएनएस चे ३२४(४), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), आर्म अ‍ॅक्ट ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार नितीन सप्तर्षी करत आहेत. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस निरीक्षक खगेंद्र टेंभेकर यांनी आरोपींना ताब्यात घेण्यासाठी हवालदार गुलाब मोकाटे, हवालदार आदेश घोडके, कॉन्स्टेबल अजय ठुबे यांच्या पथकाला पाठवून आरोपी ताब्यात घेतले.

# कमिशन एजंटांच्या बंदोबस्तासाठी शिंगणापूर गाव बंदचा इशारा

**गणेशवाडी (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील शिंगणापूर येथील कमिशन एजंटांचा बंदोबस्त करण्यासाठी ग्रामस्थांनी गाव बंदची हाक दिली आहे.

दि. २३ रोजी शनिशिंगणापूर येथील पथकर नाक्यावर कमिशन एजंट, ग्रामपंचायत कर्मचारी व भावीक यांच्यात मोठी वादाची ठिणगी पडली. आपल्या गाळ्यावर येणारे वाहन आहे. त्याकडून पथकर पावती घेऊ नकोस असे म्हणत असताना दारुच्या नशेत असणाऱ्या लटकूने पथकर नाक्यावरील सोमनाथ बानकर नामक कर्मचाऱ्यावर हल्ला करत जखमी केले. तशी रितसर फिर्याद देखील शिंगणापूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.



कमिशन एजंटांचा बंदोबस्त होत नाही तोपर्यंत गाव बंद ठेवण्याचा निर्णय ग्रामस्थांनी तातडीने ग्रामसभा घेत घेतला आहे. तशा आशयाचे निवेदन गृहमंत्री, जिल्हाधिकारी, उपविभागीय पोलीस अधीक्षक, तहसीलदार, सहायक पोलीस निरीक्षक यांना ग्रामस्थांनी दिले.

# कोल्हार खुर्द येथे आजपासून ज्ञानेश्वरी पारायण

**कोल्हार (वार्ताहर)–** राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथे दि. १ ऑगस्ट रोजी श्रीराम मंदिर जीर्णोद्धार व नूतन मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. त्यानिमित्ताने २५ जुलैपासून येथे श्रीराम मंदिराच्या प्रांगणात ज्ञानेश्वरी पारायण व हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ ते ५ भागवत पुराण, दुपारी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ७ ते ९ कीर्तन व त्यानंतर महाप्रसाद असा दैनंदिन कार्यक्रम आहे. आज गुरुवारी धनंजय महाराज ढोकणे, २६ रोजी निलेश महाराज शिरसाठ, २७ रोजी श्रीकांत महाराज गागरे, दि. २८ रोजी नामदेव महाराज क्षीरसागर, दि. २९ रोजी मनोहर महाराज सिनारे, दि. ३० रोजी शंकर महाराज लोखंडे, दि. ३१ रोजी राजेंद्र महाराज चितळकर यांची किर्तने होणार आहेत. १ ऑगस्ट रोजी अरुणनाथगिरी महाराज यांचे दुपारी ४ वाजता काल्याचे कीर्तन होईल व त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे. याच दिवशी त्यांच्याहस्ते श्रीराम मंदिर नूतन मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होईल. पारायण सोहळ्याचे व्यासपीठ चालक नामदेव महाराज क्षीरसागर आणि माधव महाराज मिजगुले आहेत.

# जिल्हास्तरीय योगा स्पर्धेत गडाख प्रथम तर शिक्षक गटात इल्हे द्वितीय

**संगमनेर (प्रतिनिधी) –** महाराष्ट्र योग असोसिएशन पुणे यांच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय ऑनलाईन योग स्पर्धेत संगमनेर तालुक्यातील पारेगाव बुद्रुक प्राथमिक शाळेची प्रियंका गडाख हिने पाचवी ते सातवीच्या गटात जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धेत तिने १ हजार ५०० रुपयांचे रोख पारितोषिक व सन्मानपत्र मिळवले आहे. तसेच शिक्षक गटात याच शाळेचे पदवीधर शिक्षक सुखदेव इल्हे यांनी जिल्ह्यात दुसरा क्रमांक पटकावत एक हजार रुपयांचे रोख पारितोषिक व सन्मानपत्र मिळविले आहे. या स्पर्धेत पारेगाव बुद्रुक शाळेच्या २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत व्हिडिओच्या माध्यमातून ऑनलाईन सहभाग नोंदवत सन्मानपत्र पटकावले आहे..



प्रकल्प प्रमुख आनंद वाघ यांनी सूर्यनमस्कार, योगासन, प्राणायाम ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून जिल्हा परिषद शाळेतील मुलांनी योगाचा चांगला अभ्यास करावा, उत्तम आरोग्य व मनशांती मिळवत आरोग्य संपन्न जीवन जगावे या उद्देशाने या जिल्हास्तरीय ऑनलाईन योगा स्पर्धेचं आयोजन आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने करण्यात आले असल्याची माहिती दिली.

योग स्पर्धेतील यशाबद्दल शिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी भांगरे, केंद्रप्रमुख कल्पना बिडवे, मुख्याध्यापक साहेबराव गायकवाड, डॉ.महादेव अरगडे, योगशिक्षक कैलास कानवडे, चं. का. देशमुख, विनोद राऊत, सोमनाथ मदने, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, ग्रामस्थ यांनी कौतूक केले आहे. स्पर्धा यशस्वी संपन्न होण्यासाठी शाळेतील केशव बाळसराफ, नंदू कुडेकर तसेच सर्व शिक्षक यांचे सहकार्य लाभले.

# वंजारवाडी येथे दुचाकीच्या धडकेत भाऊ-बहिण जखमी

**गणेशवाडी (वार्ताहर)–** सोनई जवळील वंजारवाडी येथे झालेल्या अपघातात दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

२१ जुलै रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास शोभा बाबासाहेब कुऱ्हे (वय ५०) व त्यांचा भाऊ बाबासाहेब रामभाऊ भोगे दोघे रा. खरवंडी ता. नेवासा हे आपल्या दुचाकी (एमएच १७ बीई ६५२५) वर ब्राम्हणी वरून सोनईकडे येत असताना वंजारवाडी गावच्या कमानीजवळ भरधाव दुचाकीने (एमएच १६ डीई ७६२९) फिर्यादी यांच्या दुचाकीस जोराची धडक दिली व आपली दुचाकी त्याच ठिकाणी सोडून पळून गेला. या फिर्यादीवरून गुन्हा र नं व कलम ३१५/२०२४ बीएनएस २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४)(५), मोटार वाहन कायदा कलम १८४/१७७, १३४(अ) (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक फौजदार के. बी. राख करत आहेत.

# पोल्ट्री फार्ममुळे आरोग्य धोक्यात बेल्हेकरवाडी ग्रामस्थांचे उपोषण सुरू




**सोनई (वार्ताहर)–** सोनई जवळील बेल्हेकरवाडी येथे पोल्ट्री फार्ममुळे गावातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून त्यामुळे ग्रामस्थांनी उपोषण सुरू केले आहे.

बेल्हेकरवाडी येथील पोल्ट्री फार्म मुळे परिसरात दुर्गंधी निर्माण झाली असून माशांचा वावर वाढला आहे. पक्षांच्या आवाजाचा त्रास होत असून या पोल्ट्री फार्म मधील पक्षी आणि पक्षांची पिसे जाळली जातात त्यामुळे वातावरणात धूर निर्माण होऊन प्रदूषण होत आहे व त्या धुराचा दुर्गंध परिसरामध्ये पसरत आहे. त्यामुळे मानवी जीवास धोका निर्माण झालेला आहे. सदरील पोल्ट्री फार्म विरोधात योग्य ती कारवाई होण्यासाठी २७ मे रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले होते तरी या पोल्ट्री फार्मवर कुठल्याही प्रकारची कारवाई न झाल्याने बुधवार २४ पासून वीर हनुमान मंदिर, बेल्हेकरवाडी येथे ग्रामस्थ आमरण उपोषणास बसलेले आहेत.

उपोषणाचे निवेदन तहसीलदार, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत, पोलीस ठाणे यांना देण्यात आलेले आहे.

# टाकळीभान येथे रोडरोमीओची दुचाकी जमावाने जाळली

## एक ताब्यात दुसरा पसार

**भोकर/ टाकळीभान (वार्ताहर) –** महाविद्यालयीन विद्यार्थीनींचा पाठलाग करणाऱ्या रोडरोमीओची दुचाकी संतप्त जमावाने जाळल्याची घटना काल श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे घडली. या घटनेत एकास नागरिकांनी पाठलाग करून ताब्यात घेतले तर दुसरा पसार झाला.

रोडरोमीओला पकडल्याचे समजताच जमाव जमा झाला होता. काही सुज्ञ नागरीकांनी पकडलेल्या एकास गाळ्यात डांबून ठेवले. परंतु संतप्त जमावाने त्या रोडरोमीओची मोटारसायकल जाळली. व त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. याप्रकरणी रात्री उशीरापर्यंत तालुका पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

टाकळीभान येथील विद्यार्थिनी नेहमीप्रमाणे महाविद्यालयाची सुटी झाल्यानंतर एसटीने घरी परतत असताना दोन रोडरोमीओ



एसटीचा पाठलाग करत असल्याचे लक्षात आल्याने त्या विद्यार्थिनींनी आपल्या पालकांशी संपर्क करून प्रकार सांगितला. पालकांनी लागलीच धाव घेत त्या एसटी पर्यंत पोहचले तर ते दोन रोडरोमीओ एसटीचा पाठलाग करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. पालकांनी त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. पाठलाग करत त्यांना पकडण्यात आले. परंतु एकाने पालकांना हुल देत पलायन केले. व एक जण पालकांच्या हाती लागला. या पालकांनी त्या रोडरोमीओस मोटार सायकलसह टाकळीभान येथे पोलिसांच्या ताब्यात देण्यासाठी नेले. परंतु तेथे पोलीस उपलब्ध नसल्याने, रोडरोमीओ पकडल्याचे समजताच तेथे मोठा जमाव जमा झाला. संतप्त जमाकडून होणारी मारहाण टाळण्यासाठी काहींनी एकास गाळ्यात बंद करून ठेवले.

हा प्रकार समजताच तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संजय निकम, हवालदार राजु त्रिभुवन, कॉन्स्टेबल संतोष कराळे, कॉन्स्टेबल विठ्ठल थोरात हे घटनास्थळी दाखल झाले. त्या पाठोपाठ पोलीस उपअधीक्षक डॉ. बसवराज शिवपुंजे व शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, हवालदार दादासाहेब लोढे, प्रशांत रणनवरे आदींसह मोठा फौजफाटा दाखल झाला.

यावेळी रोडरोमीओस पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. दरम्यानच्या काळात टाकळीभान येथील संतप्त जमावाने त्या रोडरोमीओच्या दुचाकीची मोडतोड करत राज्यमार्गावर जाळली. रात्री उशीरापर्यंत तालुका पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

# शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांचा शासनदरबारी पाठपुरावा करणार

## आ. सत्यजित तांबे : राहाता तालुक्यातील शाळांना भेटी

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राज्यात अजूनही शासनदरबारी शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्या असून त्या सोडविण्यास आपले प्रथम प्राधान्य राहील, अशी ग्वाही नाशिक विभाग पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी दिली आहे.

आ. तांबे यांनी तालुक्यातील कोल्हार, बाभळेश्वर व केलवड येथील माध्यमिक शाळांना भेटी देत तेथील शिक्षकांच्या समस्या जाणून घेतल्या. जुनी पेन्शन योजना, वेतन पथकातील शिक्षकांचर प्रलंबित थकीत बिले, वैद्यकीय प्रतिपूर्तीची रक्कम तात्काळ अदा करावी. मुल्यांकनास प्राप्त शाळांना अनुदानाचा टप्पा जाहीर करावा तसेच शिक्षकांना सर्वत्र एक तारखेला वेतन मिळावे यासाठी आपण प्रयत्न करून शासनास निर्णय घेण्यास भाग पाडू.



कोल्हार येथील रयतच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या पर्यवेक्षिका संजिवनी नाईक यांनी आ. तांबे यांचे स्वागत केले. केलवड येथील ज्ञानेश्वर विद्यालयात मुख्याध्यापक आर. जी. गायकवाड यांनी स्वागत केले. यावेळी आ. तांबे यांनी शाळांच्या समस्या समजून घेत त्या सोडविण्याबाबत प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी रामभाऊ गमे, जी. यु. निर्मळ, भारत गमे, भाऊ मगर, सतीश घोरपडे, हेमंत गोर्डे, चंद्रकांत मुजमुले, सविता धस, सपना गायकवाड, करुणा चव्हाण, छाया भोसले, अर्चना वर्पे, आशा गमे आदी उपस्थित होते.

त्यांनी केलवड येथील वीर जवान स्वर्गीय गणेश दगडू गोर्डे यांच्या कुटुंबियांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. यावेळी शाळाभेट दौऱ्यात आप्पासाहेब तुरकणे, बाळासाहेब वर्पे हे सहभागी झाले होते.

# राजुरी सोसायटी अध्यक्षपदी सोपान कदम उपाध्यक्षपदी सुधीर गोरे यांची बिनविरोध निवड



**राजुरी (वार्ताहर) –** राहाता तालुक्यातील राजुरी सोसायटीच्या अध्यक्षपदी सोपान कदम तर उपाध्यक्षपदी सुधीर गोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

तालुका उपनिबंधक श्री. खेडकर यांच्या सूचनेनुसार श्री. शेख यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी सोसायटीचे ज्येष्ठ संचालक सोपान भिकाजी कदम यांची अध्यक्षपदी तर युवा संचालक सुधीर बन्सी गोरे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी संचालक डॉ. सोमनाथ गोरे, मावळते अध्यक्ष नानासाहेब गोरे, मावळते उपाध्यक्ष बाबासाहेब राहींज, चंद्रभान गुंजाळ, सुरेश कसाब, अशोक गोरे, गंगाधर लाळगे, बाळासाहेब भालेराव, संजय गोरे, हिराबाई खर्डे व निर्मला गोरे उपस्थित होते. सूर्यभान गोरे, रावसाहेब गोरे, आर. डी. कदम, सुरेश गोरे, आर आर गोरे, दत्तात्रेय गोरे, शिवनाथ गोरे, विष्णुपंत खर्डे, मच्छिंद्र पठारे, तंटामुक्तीचे उपाध्यक्ष जालिंदर पठारे, जना लाळगे, विठ्ठल मोरे, रोहित तुपे, नानासाहेब शेंडगे संभा गोरे, रामा गोरे, सतीश तेलोरे, सचिव बाळासाहेब गोरे यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोसायटी ना. राधाकृष्ण विखे पाटील, सुजय विखे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे. गरजू सभासदांना कर्ज वाटप, नियमाने वसुली करणे, सभासदांना वेळेवर खतपुरवठा व रेशन वाटप संस्थेतर्फे अतिशय व्यवस्थितपणे केले जाते, डिव्हिडंट दिला जात आहे.

# अमृतवाहिनीतील ८० विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

**संगमनेर (प्रतिनिधी)–** येथील अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या ८० विधार्थ्यांची बांधकाम क्षेत्रातील नावाजलेल्या कंपन्यांमध्ये थेट मुलाखतीद्वारे निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश यांनी दिली आहे. सिव्हिल इंजिनिअरिंग क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी महाविद्यालयाला भेटी दिल्या. यातील बहुसंख्य कंपन्या ह्या सिव्हिल इंजिनिअरिंग सॉफ्टवेअर क्षेत्रात कार्यरत आहेत. या शैक्षणिक वर्षात आत्तापर्यंत १८ बांधकाम क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट कंपन्यांनी विध्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह घेतले. यातून थेट मुलाखतीद्वारे आत्ता पर्यंत ८० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या थेट मुलाखतीसाठी प्लेसमेंट विभागाचे प्रा. प्रवीण वाकचौरे, सिव्हिल इंजिनिअरिंग समन्वयक प्रा.एन.के. खैरनार, विभाग प्रमुख डॉ.एस.बी. कांडेकर यांनी विशेष प्रयत्न केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजीमंत्री आ. बाळासाहेब थोरात, मा.आ.डॉ. सुधीर तांबे, विश्वस्त सौ. शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर अकाडमिक्स डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. एस. बी. कांडेकर आदींनी स्वागत केले आहे.